पोउपा/वाहतुक/प्रशा-१/अधिसुचना/४९ /२०१६
पोलीस उपायुक्त,वाहतुक विभाग यांचे कार्यालय,
ठाणे शहर. दि. २५ /०८/२०१६

**ठाणे शहर**

## -: वाहतुक नियंत्रण अधिसुचना :-

ज्याअर्थी भिवंडी, कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ व बदलापुर शहरामध्ये रुंद रस्त्यांची कमतरता असुन वाहनांची मोठी संख्या व पार्किंग सोईंचा अभाव यामुळे रस्त्यांवर वाहनांची दाटी होत आहे ; आणि

ज्याअर्थी विविध प्रकारची अवजड वाहने अरुंद रस्त्यांवर व लहान चौकांमध्ये पार्क केली जाऊन रस्त्याचा बहुतांश भाग व्यापुन नियमित वाहतुकीस अडथळा निर्माण करित आहेत ; आणि

ज्याअर्थी अशा अवजड वाहनांच्या रस्त्यावरील पार्किंगमुळे होणा-या वाहतुक कोंडीचा (Traffic Jam) गंभीर मन:स्ताप दुचाकी, तीनचाकी व चारचाकी हलक्या वाहनांवरुन मार्गक्रमण करणा-या सर्वसामान्य नागरीकांस सहन करावा लागत असुन शाळेत जाणारी लहान मुले, नोकरीच्या ठिकाणी जाणारी चाकरमान मंडळी, रुग्णवाहिका व जीवनावश्यक सोईसुविधा पुरविणारी छोटी वाहने यांचे सुकर मार्गक्रमणास नित्याची बाधा निर्माण होत आहे; आणि

ज्याअर्थी माझी अशी खात्री झाली आहे की, सदर शहरातील रस्त्यांवर अवजड वाहनांची होणारी पार्किंग प्रतिबंधित केल्याशिवाय भिवंडी, कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ व बदलापुर शहरातील उक्त वाहतुक समस्येचे समाधान होऊ शकत नाही ;

त्याअर्थी, मी, संदीप भानुदासराव पालवे, मला ठाणे शहर वाहतुक विभागाचा पोलीस उपायुक्त म्हणुन महाराष्ट्र शासन, गृहविभाग क्र.एम.व्ही.ए.११६/सीआर/३७/टीआर दि.२७-०९-१९९६ चे अधिसुचनेनुसार व मोटार वाहन कायद्याचे कलम ११५, ११६(१)(अ)(ब) व ११७ अन्वये प्राप्त अधिकारानुसार अधिसुचना निर्गमित करतो की,

**भिवंडी, कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ व बदलापुर या शहरामध्ये सर्व प्रकारच्या अवजड वाहनांना (Heavy Motor Vehicles) या शहराचे आंतरभागात कुठल्याही रस्त्यावर वाहन पार्किंग करण्यास मनाई करण्यात येत आहे. या आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती 'मोटार वाहनांचा अधिनियम, १९८८' मधील कलम १७९(१) अन्वये रु.५००/- (रुपये पाचशे फक्त) इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र असेल.**

सदरची अधिसुचना दिनांक ०१-०९-२०१६ पासुन तीन महिन्यांसाठी प्रायोगिक तत्वावर लागु करण्यात येत आहे. या कालावधित काही सुचना / आक्षेप असल्यास ते लेखी स्वरुपात पोलीस उपायुक्त, वाहतुक नियंत्रण विभाग, तीन हात नाका, एल.बी.एस.रोड, ठाणे (पश्चिम) येथे कळवावेत. सदरची अधिसुचना प्रसिध्द झाल्यापासुन तिमाहित काही सुचना वा आक्षेप प्राप्त न झाल्यास पुढे सदरची अधिसुचना कायमस्वरुपी अंमलात राहील.

(संदीप भा.पालवे)
पोलीस उपायुक्त,वाहतुक विभाग
ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा प्रसिध्दि अधिकारी, ठाणे

२/- या अधिसुचनेची प्रसिध्दि करणेस आपणास विनंती करणेत येत आहे.

प्रत मा.सविनय सादर :-

१.मा.पोलीस आयुक्त साो, ठाणे शहर

२.मा.पोलीस सह आयुक्त साो, ठाणे शहर.

प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी सविनय सादर

मा.आयुक्त, भिवंडी-निजामपुरा, कल्याण-डोंबीवली व उल्हासगनर महानगरपालिका.

मा.मुख्याधिकारी, अंबरनाथ व कुळगांव- बदलापुर नगरपरिषद.

२/- आपणास विनंती करण्यात येते की, आपण मोटार वाहन कायद्याचे कलम ११६(१)(अ)(ब) अन्वये संबंधित ठिकाणी सुयोग्य दिशादर्शक फलक लावणेबाबत अधिनस्थ अधिका-यांना आदेश निर्गमित करावेत.

प्रत माहितीस्तव

मा.जिल्हाधिकारी, ठाणे

प्रत कार्यवाहीस्तव

१. वाहतुक सपोआ.वाहतुक उपविभाग, भिवंडी / कल्याण / उल्हासनगर.

२.प्रभारी अधिकारी, भिवंडी, कल्याण, डोंबीवली, कोळशेवाडी, उल्हासनगर, विठठलवाडी, अंबरनाथ युनिट

प्रत :- पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे विभाग, ठाणे.

२/- कृपया सदरची अधिसुचना ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणेस विनंती आहे.

प्रत :- समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे शहर.

२/- त्यांनी याबाबतची प्रसिध्दि ई पोलीस पत्रकात द्यावी.